श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-१२अ | डिसेंबर-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२ |

## भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात 'युरॉलॉजी' विषयी आंतरराष्ट्रीय कार्यशाळा




*इंटरनॅशनल वर्कशॉप ऑन युरॉलॉजी (बसलेले, डावीकडून)- डॉ. संजीव पाटणकर, ख्रिस्टिन हुबेरटुस, डॉ. स्नेहा नाईक, डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग, डॉ. तायसीर सायेग, डॉ. सतेज सबनीस, श्री. मार्कस शार्फेन; मागील रांग - सहभागी प्रतिनिधी डॉक्टर्स*

'क्नापशाफ्ट क्लिनिक', सारलॅन्ड, जर्मनी आणि वालावलकर रुग्णालय, डेरवण यांनी संयुक्तपणे 'युरॉलॉजी' या विषयीची एक कार्यशाळा आयोजित केली होती. दि. १ ते ६ डिसेंबर या काळात डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग (सुलबाख हॉस्पिटलच्या युरॉलॉजी विभागाचे प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत डॉ. लॅन्ग यांच्यासोबत डॉ. स्नेहा नाईक (असिस्टंट प्रोफेसर ऑफ युरॉलॉजी), डॉ. तायसीर सायेग (असोसिएट प्रोफेसर ऑफ जनरल सर्जरी, रास्टफुल क्लिनिक, सारब्रुकन, सारलॅन्ड, जर्मनी), हायक बेकर आणि ख्रिस्टिन हुबेरटुस या ऑपरेशन थिएटर परिचारिका सहभागी झाल्या होत्या. डेरवण रुग्णालयात नियमितपणे येऊन आपल्या कौशल्याचा आणि ज्ञानाचा उपयोग रुग्णांसाठी करणारे मुंबईचे प्रख्यात युरोसर्जन डॉ. सतेज सबनीस हेही या कार्यशाळेसाठी आवर्जून उपस्थित होते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, महाराष्ट्र अशा विविध राज्यातून आलेल्या तेरा युरोसर्जन्सनी या पहिल्याच आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला दिलेल्या उत्साही प्रतिसादामुळे ही कार्यशाळा अत्यंत यशस्वीपणे पार पडली.

**या कार्यशाळेत खालील विषयांचा समावेश होता -**

**१. शस्त्रक्रिया प्रात्यक्षिके -**

अ. टीयूआर प्रोस्टेट (TUR Prostate)

ब. अल्ट्रासाउंड गायडेड प्रोस्टेट बायॉप्सी (Ultrasound guided Prostate Biopsy)

क. टीयूआर-ब्लॅडर ट्युमर (TUR-Bladder Tumor)

ड. युरेटेरो-रेनोस्कोपी - सेमिरिजिड अॅन्ड फ्लेक्सिबल (Uretero-Renoscopy - semirigid and flexible) RIRS --Retrograde Intrarenal Surgery)

इ. पीसीएनएल/ मिनिपीसीएनएल PCNL/Mini PCNL (Percutaneous Nephrolitholapaxy)

## २. स्किल्स लॅब – Skills Lab

अ. सिंथेटिक मॉडेल्स/ डमीज (Synthetic models/ dummies)

ब. उपकरणांचा वापर आणि निगा (Instrument demonstrations and care)

## ३. प्रेझेन्टेशन

अ. शस्त्रक्रियेची क्रमश: कार्यपद्धती (Step by step surgical procedure)

ब. 'एन्डोयुरॉलॉजी'मधील अद्ययावत माहिती (Updates in Endourology)

क. गोलमेज चर्चासत्र (Round table conference )

## कार्यशाळेचा शुभारंभ

कार्यशाळेची सुरुवात दि. १ डिसेंबर रोजी सकाळी एका लहानशा समारंभाने झाली. वालावलकर रुग्णालयाचे डॉ. नेताजी पाटील यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटिज ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव



दीपप्रज्वलन –श्री. विकासराव वालावलकर,

वालावलकर यांना जर्मन वैद्यकीय पथक आणि या कार्यशाळेसाठी सर्व अत्याधुनिक मशिनरी आणि तांत्रिक साहाय्य पुरवणारे 'रिचर्ड वुल्फ, इंडिया' कंपनीचे मॅनेजिंग डिरेक्टर श्री. मार्कस शार्फेन (Mr. Scharfen) आदींचा परिचय करून दिला. श्री. विकासराव आणि डॉ. लॅन्ग आणि त्यांचे सहकारी तसेच श्री. शार्फेन यांनी दीपप्रज्वलन केल्यावर डॉ. संजीव पाटणकर (MS Gen. Surgery (Mumbai), FRCS (Edinburgh)- Colon & Rectal Surgeon) यांनी सभेची सूत्रे हाती घेतली.

जर्मन वैद्यकीय पथकाचे सदस्य (Faculty) आणि भारताच्या विविध प्रांतातून आलेले प्रतिनिधी (Delegates) तसेच 'रिचर्ड वुल्फ, इंडिया'चे प्रतिनिधी या सर्वांचे स्वागत करताना, सर्वप्रथम जर्मन भाषेत,'Guten Morgen!' अशा शुभेच्छा देऊन डॉ. पाटणकर यांनी पाहुण्यांची मने जिंकली. पाहुण्यांनीही सुहास्य मुद्रेने त्याला प्रतिसाद दिला आणि कार्यशाळेच्या काळात परस्पर आदराचे, सहकार्याचे आणि सौजन्याचे वातावरण असेल याची प्रचिती आली.



दीपप्रज्वलन – डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग



दीपप्रज्वलन – श्री. मार्कस शार्फेन

वालावलकर रुग्णालयाच्या वतीने सर्वांचे स्वागत करून डॉ. पाटणकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणाच्या सुरुवातीलाच संतोष व्यक्त केला की जागतिक दर्जाच्या वैद्यकीय व्यावसायिकांकडून या कार्यशाळेत या रुग्णालयातील डॉक्टर्स आणि प्रोफेसर्स तसेच देशभरातून या कार्यशाळेसाठी आलेले प्रतिनिधी यांना अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचे भरपूर शिक्षण मिळणार आहे. गोरगरिबांच्या सेवेसाठी दुर्गम परंतु निसर्गरम्य अशा या परिसरात उभारलेल्या या रुग्णालयातील पायाभूत सुविधा पाहून डॉ. लॅन्ग यांना समाधान वाटेल असा विश्वास व्यक्त करून ते म्हणाले, ''आपल्या देशात अशा प्रकारची कार्यशाळा प्रथमच आयोजित करण्यात आलेली आहे. या कार्यशाळेसाठी सुमारे तीन कोटी रुपयांची अत्याधुनिक मशिनरी रिचर्ड वुल्फ कंपनीने जर्मनीहून येथे आणली आहे. ही सर्व सामुग्री येथे आणण्यासाठी दोन मोठे टेम्पो वापरावे लागले. तेव्हा अशी कार्यशाळा येथे होणे ही मोठी भाग्याचीच गोष्ट आहे.

डॉ. लॅन्ग हे एवढे जगप्रसिद्ध आहेत की मी त्यांचे गुणवर्णन करण्याची आवश्यकता नाही. जर्मन देशाची ख्याती त्यांच्या शंभर टक्के अचूकपणासाठी, परिपूर्णतेच्या आग्रहासाठी आहे. तपशिलाबाबतची जागरूकता, शिस्त यासाठी त्यांची ख्याती आहे. या तीनही गुणांचा वापर जर वैद्यकीय ज्ञानाबरोबर झाला तर त्यामुळे वैद्यकीय सेवा ही रुग्णांसाठी वरदानच ठरेल.''

या प्रस्ताविकानंतर श्री. विकासराव आणि सर्व पाहुण्यांच्या हस्ते या संस्थेचे संस्थापक आणि प्रेरणास्थान श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करण्यात आले. डॉ. लॅन्ग यांच्यासह सर्व पाहुण्यांनी अगदी भारतीय पद्धतीने, आपली पादत्राणे काढून ठेऊन आदरपूर्वक दीपप्रज्वलन केले. दीपप्रज्वलनानंतर डॉ. नेताजी पाटील यांनी संस्थेच्या कार्यावर आधारित एक सादरीकरण करून संस्थेतर्फे चाललेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.



*डॉ. नेताजी पाटील – संस्थेच्या कार्याविषयी सादरीकरण*

सादरीकरणानंतर श्री. विकासराव यांनी सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, ''१९६९ साली हा ट्रस्ट स्थापन झाला. १९९६ साली हे रुग्णालय सुरू झाले. प्रथमपासूनच गोरगरिबांची सेवा हे या रुग्णालयाचे ध्येय आहे. ती सेवा उत्तमात उत्तम प्रकारे मिळावी यासाठी आमचे प्रयत्न असतात. आज जर्मन टीम येथे आमच्या रुग्णालयातील तसेच अन्य प्रांतातील डॉक्टर्सना येथे आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचे शिक्षण देणार आहेत. याचा आम्हाला विशेष आनंद वाटतो. जर्मन देश त्यांच्या इंजिनीअरिंग क्षेत्रात, मशिनरी उत्पादनात त्यांच्या उत्पादनाच्या अचुकतेसाठी, मजबुतीसाठी, टिकाऊपणासाठी ख्यातनाम आहे. प्रिंटिंग मशिनरी, मोटर कार, वैद्यकीय उपकरणे आणि मशिनरी अशा अनेक क्षेत्रात त्यांचा दबदबा आहे. आम्हाला त्या देशाविषयी, त्यांच्या क्षमतेविषयी, ज्ञानोपासनेविषयी आदर आहे. अशा तंत्रकुशल देशातील हे वैद्यकीय पथक येथे येऊन आमच्या डॉक्टर्सना, तसेच या कार्यशाळेसाठी आलेल्या प्रतिनिधींना आपल्या कौशल्याचे, नव्या तंत्राचे प्रशिक्षण देणार आहेत. ही बाब आमच्या वैद्यकीय सेवेचा स्तर उंचावणारी आहे आणि पर्यायाने आमच्या रुग्णांसाठी, शिकाऊ डॉक्टरांसाठी मोठी भाग्याची गोष्ट आहे. ट्रस्टच्या कार्याला नवी ऊर्जा देणारी आहे.माझ्या या कार्यशाळेसाठी खूप खूप शुभेच्छा आहेत.''



*श्री. विकासराव वालावलकर पाहुण्यांचे स्वागत करताना*

डॉ. नाडकर्णी या कार्यशाळेला शुभेच्छा देताना म्हणाले, ''हे रुग्णालय मला नेहमीच आश्चर्याचे धक्के देते कारण येथे सदैव नवनवे उपक्रम होत असतात. या कार्यशाळेचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात सहभागी झालेले मातब्बर, प्रशिक्षित वैद्यकीय व्यावसायिक आणि त्याला वैद्यकीय तंत्रज्ञानाचे पाठबळ. म्हणून आपल्या सर्वांचे स्वागत करताना आपणाला येथे एक संपन्न अनुभव प्राप्त होईल असा विश्वास मला वाटतो. काल बोलताना डॉ. लॅन्ग यांनी ही कार्यशाळा परस्परांमध्ये संवाद साधणारी (Interactive) व्हावी अशी अपेक्षा

व्यक्त केली. त्यामुळे येथे ज्ञानाची, अनुभवाची भरपूर देवाणघेवाण होईल असा विश्वास आहे. सर्व सहभागी तज्ज्ञ प्रशिक्षक आणि ज्येष्ठ शल्यविशारद यांना शुभेच्छा!''

डॉ. स्नेहा नाईक आपल्या भाषणात म्हणाल्या, ''वालावलकर रुग्णालयाने आयोजित केलेल्या या कार्यशाळेत आम्हाला सहभागी होता आले हा आमचा सन्मानच आहे. श्री. विकासराव वालावलकर यांनी आम्हाला निमंत्रित केले आणि ही सेवेची संधी दिली त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

''माझे वरिष्ठ डॉ. लॅन्ग यांचे मला आभार मानले पाहिजेत कारण त्यांनी तत्परतेने या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी संमती दिली आणि पुढाकारही घेतला! डॉ. लॅन्ग नेहमी म्हणतात, 'मानवजातीची आणि तिच्या आरोग्याची काळजी वाहणे हेच वैद्यकीय व्यवसायाचे प्रधान उद्दिष्ट आहे!'

''मी माझे वैद्यकीय शिक्षण येथेच पूर्ण करून माझ्या आईवडिलांच्या पाठिंब्यामुळे जर्मनीला गेले. तेथे डॉ. लॅन्ग यांच्यामुळे 'युरॉलॉजी'मध्ये मी माझे करिअर केले. मी सर्वांना शुभेच्छा देते आणि सर्वांनाच या कार्यशाळेतून काहीतरी उपयुक्त असे मिळेल अशी आशा व्यक्त करते. मानवजातीसाठी मी काहीतरी, अगदी थोडेसे का होईना, पण काहीतरी काम करीन अशा भावनेने काम केले तर त्याचा नक्कीच तिच्या भल्यासाठी उपयोग होऊ शकतो, भले तो बदल अगदी नगण्य, १-२% का असेना!''

शेवटी डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग यांनी आपली भूमिका विस्तृतपणे काही ग्राफिक्सच्या साहाय्याने मांडली. ''आपण मला निमंत्रित केलेत हा माझा केवळ सन्मान नसून मला या कार्यशाळेत सहभागी होण्याने मला खरोखरच फार आनंद झाला आहे. हे स्थान मला खूप आवडते!'' अशी सुरुवात करून ही कार्यशाळा कशाप्रकारची असेल याचे सूत्रबद्ध विवेचन केले.

सर्वप्रथम आरोग्यसेवेची ध्येयधोरणे कोणती असावीत याविषयी त्यांनी चार मुद्दे मांडले.

१. डॉक्टर्सनी रुग्णांच्या आरोग्याची काळजी घेणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.
२. अखंड वैद्यकीय शिक्षण. केवळ सुरुवातीला घेतलेल्या शिक्षणावर थांबणे योग्य नाही तर सदैव शिकत राहिले पाहिजे.
३. ज्ञान आणि अनुभवांची देवाणघेवाण. हा मुद्दा विशद करताना ते म्हणाले की जर्मनीमध्ये आम्ही केवळ ज्ञान संपादन करणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता ज्ञान आणि अनुभवांची इतरांबरोबर देवाण घेवाण करणे हे आपले कर्तव्य आहे असे मानतो. भारतात याबाबत काय धारणा आहेत हे आपणासोबत चर्चा करून जाणून घ्यायला मला आवडेल.
४. सध्या रुग्णालयात संशोधन करणे शक्य नसले तरी भविष्यात लवकरच ते शक्य होईल.

जर्मनी आणि भारत यांच्यामध्ये धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या खूप फरक आहे. जी येथील संस्कृतीशी सुसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट टाळणे योग्य होईल. येथील आध्यात्मिक धारणांच्याविषयी मी अज्ञानी असल्यामुळे कृपया आपण मला त्यांच्याविषयी माहिती देणे जेणेकरून त्याविसंगत काही माझ्याकडून होणार नाही. जर काही माझ्याकडून चुकीचे वर्तन घडले तर मला लगेच त्याविषयी जाणीव करून द्या.

रुग्णसेवा आणि संशोधन यासंदर्भात 'हेलसिंकी डिक्लेअरेशन'ची मार्गदर्शक तत्त्वे पाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे असा माझा विश्वास आहे. त्याचप्रमाणे आमची संस्था 'क्नापशाफ्ट' यांचेही काही नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यानुसार त्यांनी स्वत:सह आपल्या सहकाऱ्यांविषयी आवश्यक ती सर्व माहिती देऊन या कार्यशाळेत सहभागी होण्यामागील भूमिका स्पष्ट केली.

आपणाला निमंत्रण दिल्याबद्दल त्यांनी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाचे आभार मानले. त्याचबरोबर विविध उपकरणे आणि लॅब-स्किल्स पुरविल्याबद्दल 'रिचर्ड वुल्फ, इंडिया' आणि 'प्रायमा-व्हिस्टा' या कंपन्यांचे आभार मानून 'क्नापशाफ्ट क्लिनिक'ने पुरविलेल्या 'डिस्पोझेबल्स' बद्दल तसेच त्यांच्या पाठिंब्याबद्दल आभार मानले. या वेळी त्यांनी रुग्णालयासाठी आणलेली भेटवस्तू डॉ. नेताजी पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. पुढील वर्षी कदाचित क्नापशाफ्टचे प्रेसिडेन्ट स्वत: येथे येतील अशी शक्यताही त्यांनी वर्तविली.

आपल्या 'क्नापशाफ्ट' या संस्थेच्या विविध शाखांची माहिती देताना त्यांनी सांगितले की आमचे ७ हॉस्पिटल ग्रूप्स असून ४३८० बेड्स असलेली १३ हॉस्पिटल्स आणि ३ पुनर्वसन केंद्र आहेत (Rehabilitation Centres). कर्मचाऱ्यांची संख्या ११५०० आहे. जगातील सर्वात जुनी, ७५० वर्षांचा इतिहास असलेली इन्श्युअरन्स कंपनी 'क्नापशाफ्ट'ची आहे असे त्यांनी अभिमानाने नमूद केले. आपले सारलॅन्डमधील हॉस्पिटल हे त्या भागातील पहिल्या काही हॉस्पिटल्सपैकी आहे असे सांगून हॉस्पिटलमधील विविध डिपार्टमेंट्स आणि अत्याधुनिक सोयींची त्यांनी माहिती दिली. आपल्या सहकाऱ्यांची माहितीही त्यांनी आवर्जून दिली.

या कार्यशाळेचे स्वरूप स्किल-लॅब, प्रेझेंटेशन्स, प्रत्यक्ष शस्त्रक्रिया आणि गोलमेज-चर्चा असे असेल असे सांगून त्यांनी यासबंधी विवेचन केले आणि सर्व प्रतिनिधी उत्साहाने त्यात भाग घेतील अशी अपेक्षा व्यक्त केली. सहाही दिवसांचा व्यवस्थित आखलेला कार्यक्रम आणि प्रत्येक दिवशी तीन सत्रात होणारे कामकाज आणि त्यांच्या वेळा याविषयी डॉ. लॅन्ग यांनी तपशिलवार कल्पना दिली. आम्ही जर्मनीत केलेल्या काही केसेससंबंधी माहिती देऊ आणि तुम्हीही येथील हॉस्पिटलमधून केलेल्या काही केसेसबद्दल चर्चा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करून मुक्त चर्चेसाठी व्यासपीठ खुले असेल असे ते म्हणाले.

कार्यशाळेत Lap trainer or Uretero-Renoscopy, PCNL trainer, Prostate trainer and Digital resection trainer इत्यादी अत्याधुनिक मशिनरी आणलेली असून त्याचा प्रत्यक्ष वापर प्रतिनिधींना करता येईल असे त्यांनी या मशिनरीची चित्रे मोठ्या पडद्यावर दाखवून सांगितले. आपल्या सहकाऱ्यांचा परिचयही त्यांनी करून दिला. याबरोबरच हा लहानसा अनौपचारिक समारंभ समाप्त झाला.

## कार्यशाळेचे कामकाज

उद्घाटन समारंभानंतर लगेचच कार्यशाळेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. सकाळी ९.०० ते दुपारी १.००, दुपारी २.०० ते ५.०० आणि सायंकाळी ६.०० ते ७.०० अशा तीन सत्रात काम सुरू झाले. या कार्यशाळेत प्रथम जर्मन डॉक्टर्सनी 'युरॉलॉजी'वर सखोल मार्गदर्शन करणारी व्याख्याने दिली आणि त्यावर सांगोपांग चर्चा आणि प्रतिनिधींच्या शंकांचे निरसन करण्यात आले. रुग्णालयात 'बेसिक सर्जिकल स्किल्स लॅब'ही आधीपासूनच सुरू आहे. या लॅबमध्ये 'सिम्युलेशन बेस्‌ड मेडिकल एज्युकेशन' (SBME)या पद्धतीने शिक्षण दिले जाते. या पद्धतीत रुग्ण व डॉक्टर यांच्यासाठी अधिक सुरक्षितता आहे. या लॅबचा उपयोग या कार्यशाळेसाठी मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरला. 'रिचर्ड वुल्फ, इंडिया'ने पाच प्रकारचे सिम्युलेटर्स - (advanced Mini Perc simulator, prostate biopsy simulator, TURP digital simulator, 70 Watt Urology laser machine, Laparoscopy and URS Simulators) या कार्यशाळेसाठी उपलब्ध करून दिले होते आणि त्यांच्या पश्चिम विभागाचे रिजनल मॅनेजर श्री. सतीश पोळ यांच्या नेतृत्वाखाली तंत्रज्ञांची एक टीमच कार्यशाळेत तांत्रिक साहाय्य देण्यासाठी सज्ज होती. या सिम्युलेटर्सची माहिती आणि त्याचा प्रत्यक्ष उपयोग करण्याचा सराव या स्किल-लॅबमध्ये प्रतिनिधींना देण्यात आला.

तिसऱ्या दिवसापासून प्रत्यक्ष शस्त्रक्रियांची प्रात्यक्षिके प्रतिनिधींना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दाखविण्यात आली. डॉ. स्नेहा नाईक आणि डॉ. सतेज सबनीस या वेळी प्रशिक्षणार्थींना शस्त्रक्रियेची 'प्रोसिजर' समजावून सांगत होते आणि त्यांचे शंकासमाधानही करत होते. शस्त्रक्रिया विभागाचे डॉ. अभय देसाई आणि डॉ. अजीत नेहते यांनी शस्त्रक्रिया प्रात्यक्षिके यशस्वी होण्यासाठी भरपूर परिश्रम घेतले. सायंकाळी गोलमेज चर्चेच्या वेळी सर्वांनी दररोज एकत्र जमून सखोल विचार-विमर्श केला आणि तो प्रतिनिधींसाठी फारच उपयुक्त ठरला.




*डॉ. तायसीर सायेग यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत*




*डॉ. संजीव पाटणकर सूत्रसंचलन करताना*

## सांगता समारंभ

प्रतिनिधींना सहभागाविषयी प्रमाणपत्रे देण्यासाठी आणि त्यांच्यासह पाहुण्यांना निरोप देण्यासाठी सर्व संबंधितांचा एक लहानसा मेळावा स्किल्स-लॅबमध्ये गुरुवारी आयोजित करण्यात आला होता. सूत्रसंचालक डॉ. पाटणकर यांनी ही कार्यशाळा अत्यंत यशस्वी आणि उपयुक्त ठरली आहे असे सांगून डॉ. लॅन्ग, डॉ. नाईक आणि त्यांची टीम यांचे हार्दिक आभार मानले. जगातील अत्युत्तम तंत्रज्ञान या टीममुळे येथे येऊ शकले. तंत्रज्ञान आणि समर्पित वृत्ती यांचा संगम येथे झाला. कर्तृत्वाचे शिखर गाठूनही आपल्या उदार, मृदू स्वभावाचे दर्शन डॉ. लॅन्ग यांच्या वागणुकीतून आम्हाला दिसले त्याचे अनुकरण आम्ही आमच्या आयुष्यात केले पाहिजे असे ते म्हणाले.

यानंतर सर्व प्रतिनिधींना डॉ. लॅन्ग यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन सहभागाबद्दल त्यांचे आभारही मानण्यात आले. प्रतिनिधींच्या वतीने डॉ. हरगोपाल वैद्य यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. उत्तम फॅकल्टीजकडून आम्हाला भरपूर मार्गदर्शन मिळाले आणि त्याचा उपयोग आम्हाला आमच्या रोजच्या प्रॅक्टिसमध्ये होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. सतेज सबनीस यांनी सर्वप्रथम डॉ. लॅन्ग यांचे आभार मानून त्यांच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य सांगितले. ते म्हणाले, 'डॉ. लॅन्ग यांची कोणती गोष्ट मला सर्वात आवडली असेल तर त्यांनी प्रत्येक गोष्ट अगदी तपशिलवार समजावून दिली. शस्त्रक्रियेमधील अगदी बारीकसारीक बारकावे त्यांनी जसे दाखवायला हवेत, नेमके तसेच उलगडून दाखविले. या क्षेत्रात नव्याने सुरुवात करणाऱ्याला त्यांच्याजवळ शिकायला मिळणे ही मोठीच सुसंधी आहे. डॉ. स्नेहा यांचेही आभार मानले पाहिजेत कारण आम्हा सर्वांमध्ये समन्वय साधण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. सहा महिन्यापूर्वी डॉ. लॅन्ग आणि डॉ. स्नेहा येथे आले होते. त्या वेळीच अशी वर्कशॉप्स नियमितपणे घेण्याचे ठरले होते. आणि त्यांनी भरपूर प्रयत्न करून ते लवकरच घडवून आणले. अशी वर्कशॉप्स वारंवार व्हावीत, आमच्या विद्यार्थ्यांना वारंवार असे उत्तम प्रशिक्षण मिळावे आणि डॉ. लॅन्ग आणि त्यांची टीम त्यानिमित्ताने वारंवार येथे यावी, अशा शुभेच्छा मी व्यक्त करतो.

त्यानंतर डॉ. स्नेहा यांनी सर्वप्रथम सर्व वरिष्ठ डॉक्टर्स, कर्मचारीवर्ग आणि व्यवस्थापनाचे आभार मानून भाषणाला सुरुवात केली. त्या पुढे म्हणाल्या, ''जेव्हा सहा महिन्यापूर्वी येथे आलो होतो तेव्हा आम्ही डॉ. सबनीस यांना येथे शस्त्रक्रिया करताना पाहिले आणि त्याच वेळी येथे एक कार्यशाळा घ्यावी असे आमच्या मनात आले. डॉ. लॅन्ग यांनी ठरविले की ती कार्यशाळा आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि परस्पर सुसंवादी अशी असावी. या कार्यशाळेत कल्पना आणि ज्ञानाची देवाणघेवाण व्हावी. आपण कोणत्या पद्धतीने शस्त्रक्रिया करतो, कोणती इन्स्ट्रुमेन्ट्स वापरतो, काही खास 'टिप्स आणि ट्रिक्स'ची देवाण-घेवाण, हे सगळे एकमेकांपासून शिकावे. याचा मुख्य उद्देश अर्थातच रुग्णसेवा अधिक चांगली व्हावी हा आहे.

''पण अशा प्रकारचे वर्कशॉप करायचे तर त्याला दोन्ही बाजूंकडून भरपूर कष्ट आणि सुसंवादाची, सुसूत्रतेची गरज असते.



*'हे रुग्णालय मला नेहमीच आश्चर्याचे धक्के देते ...'' डॉ. सुनील नाडकर्णी*



*डॉ. स्नेहा नाईक – ''सर्वांनाच या कार्यशाळेतून काहीतरी उपयुक्त असे मिळेल अशी आशा व्यक्त करते.''*

आपण येथे पाहिलेच आहे की येथे दोन्ही बाजूंकडून उत्तम प्रकारे ही जबाबदारी पार पडली आहे. आपण मागे दिसणाऱ्या चित्रात पाहतो आहोत की दोन हातांमध्ये 'किडनी'ची काळजी घेतली जात आहे. येथेही असेच दोन हात एकत्र आले म्हणून ही कार्यशाळा यशस्वी झाली आहे.''

अखेरीस त्यांनी जर्मन टीमचेही आभार मानले. येथे येऊन त्यांना काही नवे ज्ञान, नव्या 'टिप्स आणि ट्रिक्स' मिळाल्या असतील तर त्याचा उपयोग त्यांना रुग्णसेवेसाठी आपल्या देशात करता येईल आणि असे झाले तर ती या कार्यशाळेची मोठी फलश्रुती ठरेल असे त्यांनी भाषणाअखेरीस सांगितले.

यानंतर बोलायला उभे राहिलेले डॉ. लॅन्ग यांनी प्रथमच स्पष्ट केले, ''कार्यशाळेच्या निमित्ताने मी भरपूर बोललो आहे म्हणून आत्ता मी जास्त काही बोलणार नाही. मला दोनच महत्त्वाच्या मुद्द्यांवर बोलायचे आहे.

''पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शस्त्रक्रिया केली की डॉक्टरांची जबाबदारी संपत नाही. शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाची तब्येत व्यवस्थित आहे की नाही हे पाहणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणून शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाची काळजी घ्यायला हवी.

''जेवण तयार करताना आपण आपल्या पद्धतीने पदार्थ तयार करतो. दुसऱ्याही अनेक पद्धती असतात, त्याही वापरून पाहायला हरकत नाही. तसेच शस्त्रक्रियेच्या बाबतीतही सगळ्याच पद्धती आपणाला सोईस्कर नसतील पण काही नक्कीच वापरून पाहाव्या!''

डॉ. सुवर्णा आणि डॉ. नेताजी पाटील यांचे त्यांनी या कार्यशाळेसाठी निमंत्रित केल्याबद्दल आणि एकंदर व्यवस्थेबद्दल आभार मानले. 'रिचर्ड वुल्फ, इंडिया'ने डॉक्टरांच्या नेहमीच्या वापरातील इन्स्ट्रुमेन्ट्स येथे पुरविण्याची व्यवस्था केली, त्यामुळे ते आपली प्रात्यक्षिके व्यवस्थित दाखवू शकले. तसेच रुग्णालयातील स्किल–लॅबही अत्यंत उत्तम आहे असा उल्लेख त्यांनी केला.



*डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग – ''हे स्थान मला खूप आवडते!''*



*डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग– प्रतिनिधींना विषय त्यातील बारकाव्यांसह समजावून देताना*



सायंकाळचे गोलमेज चर्चासत्र – मनमोकळे संभाषण आणि शंकासमाधान



डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग आणि डॉ. तायसीर सायेग – शस्त्रक्रिया प्रात्यक्षिकासाठी सज्ज

डॉ. सबनीस यांचा सहभाग असल्यामुळे आपण आत्मविश्वासाने येथे शस्त्रक्रिया करू शकलो असे म्हणून त्यांनी डॉ. सबनीस यांना धन्यवाद दिले. सर्व परिचारिका, कर्मचारी, सहभागी प्रतिनिधी आणि आपले सहकारी यांचे आभार मानून त्यांनी आपले भाषण संपविले.

ही कार्यशाळा पाहून मला 'युरो सर्जन' होण्याचा मोह होत आहे असे सांगून डॉ. सुनील नाडकर्णी यांनी या कार्यशाळेची यशस्वीता अधोरेखित केली. आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून एवढ्या दूरवरून येथे येऊन कार्यशाळा घेणाऱ्या जर्मन टीमचे कौतुक करून त्यांनी त्यांचे आभार मानले. आलेल्या प्रतिनिधींमध्ये आपणाला भरपूर चांगले मित्र मिळाले आणि ही मैत्री कायम राहील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

आता डॉक्टरला आपण ही शस्त्रक्रिया कशासाठी आणि कशाप्रकारे करणार आहोत याचे स्पष्टीकरण द्यावे लागते. पूर्वी आपणाला कोणी स्पष्टीकरण विचारत नव्हते. गोलमेज चर्चेच्या निमित्ताने आपण आपल्या कृतीमागच्या विचारांची चर्चा केली पाहिजे, ज्ञान संपादन आणि अनुभवांची देवाण घेवाण केली पाहिजे. 'रिचर्ड वुल्फ, इंडिया'चेही त्यांनी तांत्रिक सहकार्यासाठी आभार मानले.

शेवटी सर्वांचे आभार मानण्यासाठी उभे राहिलेले डॉ. नेताजी पाटील म्हणाले, ''ग्रामीण भागातील अशा तऱ्हेचे हे वर्कशॉप यशस्वी करण्यासाठी संघभावनेची गरज होती. आमचे हॉस्पिटल, जर्मन टीम आणि रिचर्ड वुल्फ, इंडिया या तिघांच्या सांघिक प्रयत्नातून हे सर्व साध्य झाले आहे. डॉ. लॅन्ग आणि त्यांची टीम यांच्या सहकार्याच्या वृत्तीमुळे, सुस्वभावी वागणुकीमुळे आम्हाला बरेच काही शिकता आले. या कार्यशाळेला कसा प्रतिसाद मिळेल याविषयी आम्ही साशंक होतो, परंतु विविध प्रांतांमधून मिळालेला प्रतिसाद समाधानकारक होता.'' शेवटी सहभागी प्रतिनिधींचे, रिचर्ड वुल्फ, इंडिया यांचे आणि जर्मन टीमचे आभार मानून पुढील काळात अशाच कार्यशाळा होतील त्याला सहकार्य करण्याचे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.



प्रशिक्षणार्थींना 'पी.सी.एन.एल.'वर प्रात्यक्षिक दाखविताना डॉ. स्नेहा नाईक



लॅप्रोस्कोपी ट्रेनिंग – प्रोस्ट्रट बायॉप्सी सिम्युलेटर



*रेट्रोग्रेड इन्ट्रा-रिनल सर्जरी*



*इलेक्ट्रॉनिक टी.यू.आर.-प्रोस्टेट ट्रेनिंग*




*लॅप्रोस्कोपी सिम्युलेटर*



*मिनि पी.इ.आर.सी. सेट*



*टी.यू.आर.पी. सिम्युलेटर*



*लेझर आर.आय.आर.एस.*

या कार्यशाळेत एकूण २५ विविध प्रकारच्या मूत्रमार्गासंबंधीच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. अनेक कॅमेऱ्यांचा वापर करत या शस्त्रक्रिया स्क्रीनवर दाखविण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे प्रतिनिधींना त्या नीटपणे अभ्यासता आल्या. सहभागी प्रतिनिधींनी आपल्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.

**डॉ. अतुल मिश्रा, गोरखपूर, उत्तर प्रदेश–** मी सध्या नेपाळ मेडिकल कॉलेजमध्ये आहे. गेली तीन वर्षे मी सर्जरी करीत आहे. परंतु काही शंका आली तर एखाद्या मेडिकल कॉलेजशी संपर्क साधावा लागायचा. मला असे वाटत होते की आपणाला अधिक शिक्षणाची गरज आहे. जेव्हा मला समजले की वालावलकर हॉस्पिटलमध्ये

ख्यातनाम जर्मन डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग आणि 'रिचर्ड वुल्फ' कंपनी यांच्या सहकार्याने कार्यशाळा होणार आहे तेव्हा मी सहभागी होण्याचे ठरविले. मी माझ्या दोन मित्रांनाही हे कळविले. जागा मर्यादित असल्यामुळे डॉ. पाटील यांनी लगेच प्रवेश निश्चित करण्याविषयी सांगितले म्हणून आम्ही घाईघाईने आमच्या सीट्स पक्क्या केल्या. एवढ्या दुरून चिपळूणला उतरल्यावर मात्र असे वाटू लागले की या ग्रामीण भागातील हॉस्पिटलमध्ये येण्यात आपण बहुधा चुकीचा निर्णय घेतला आहे.

मात्र या परिसरात येताच आपण योग्य जागी आलो आहे याची खात्री पटली. ही संस्था, डॉ. नेताजी पाटील, येथील कर्मचारी, उपाहार-भोजन व्यवस्था पाहणारे कर्मचारी, केअरटेकर्स सगळेच अत्यंत सहकार्य देणारे आहेत. जेव्हा आम्ही वर्कशॉपसाठी स्किल-लॅबमध्ये प्रवेश केला तेव्हा तर आम्ही थक्कच झालो. मी आजवर अनेक ठिकाणी अशी वर्कशॉप्स पाहिली आहेत, परंतु अशी व्यवस्था कोठेच पाहिलेली नाही. एका वेळेला केवळ दहाच प्रतिनिधी असल्यामुळे अधिक चांगल्या प्रकारे प्रशिक्षण घेता येते. तुमच्या शंकांचे निरसन करून घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो. फॅकल्टीजबरोबर उत्तम संवाद होतो. आम्हाला अनेक शस्त्रक्रिया अगदी जवळून पाहायला मिळाल्या.

कॉन्फरन्सेस म्हणजे अनेक ठिकाणी गेट-टुगेदर, खाणे-पिणे, मजा करणे असेच वातावरण असते. येथे तसे नव्हते. पण तरीही आमचा प्रतिनिधींचा एक छानसा 'व्हाट्स-ॲप' ग्रूप तयार झाला आहे. त्याचा आम्हाला भविष्यात एकमेकांशी संपर्क साधून सल्लामसलतीसाठी उपयोग होईल.

अशाच प्रकारची वेगवेगळ्या विषयांची वर्कशॉप्स येथे व्हावीत. आम्हाला त्यात भाग घ्यायला पुन्हा येथे यायला आवडेल.

**डॉ. धरमपाल वैद्य, इंदोर-** माझे स्वत:चे नर्सिंग होम आहे. ते इंदोर पासून १०० कि.मी.वर एका तालुक्याच्या ठिकाणी आहे. येथे आल्यावर वालावलकर हॉस्पिटलचे इन्फ्रास्ट्रक्चर पाहून मी थक्कच झालो. वालावलकर हॉस्पिटल या ग्रामीण भागात गरिबांसाठी रुग्णसेवेचे मोठे काम करीत आहे आणि 'सर्वांसाठी आरोग्य' आणि 'सर्वांसाठी शिक्षण' ही कल्पना प्रत्यक्षात आणीत आहे.

ही कार्यशाळा आम्हाला आमच्या व्यवसायासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. डॉ. लॅन्ग, डॉ. स्नेहा हे एवढे विनम्र वृत्तीचे आहेत! त्यांचे अद्ययावत ज्ञान आणि तांत्रिक कौशल्य यामुळे आम्हाला त्यांच्यापासून खूप शिकायला मिळाले. वालावलकर हॉस्पिटल ही जी समाजाची, विशेषत: गरिबांची सेवा करीत आहे ती पाहून असे वाटते की आपणही यात काही आपला वाटा उचलावा. मला येथे वर्षातून एक-दोन वेळा येऊन सेवा करण्याची संधी मिळाली तर मी स्वत:ला धन्य समजेन!

**डॉ. प्रमोद राजभोई, सातारा-** ग्रामीण भागातील जनरल सर्जन्सना हे वर्कशॉप अत्यंत उपयुक्त आहे. या सहा दिवसात सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया पाहायला मिळाल्या. शस्त्रक्रियेत येणाऱ्या अडचणी कशा



*डॉ. स्नेहा नाईक, डॉ. नेताजी पाटील, आणि डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग स्किल-लॅबमध्ये*



डॉ. नेताजी पाटील, डॉ. सबनीस, डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग आणि डॉ. स्नेहा नाईक



प्रमाणपत्र वितरण

सोडवायच्या याची संपूर्ण माहिती येथे देण्यात आली. येथे आपण या वर्कशॉपसाठी फक्त रु. पंधरा हजार एवढे नाममात्र शुल्क घेतले. यामध्ये जेवण-निवासाच्या उत्कृष्ट सोयीसह हायटेक मशिनरी आणि परदेशातून आलेले नामवंत प्रशिक्षक उपलब्ध केले आहेत. अशा प्रकारच्या वर्कशॉपसाठी शहरात लाखभर रुपये मोजावे लागतील! उत्कृष्ट संयोजन, माहितीपूर्ण वर्कशॉप आणि फॅकल्टीज-डेलिगेट्स यांच्यामध्ये उपयुक्त संवाद यामुळे हा अतिशय उत्कृष्ट अनुभव ठरला आहे.

**डॉ. साकेत, बेगुसरई–** ही कार्यशाळा अतिशय सुंदर तऱ्हेने आयोजित केली गेली आहे. येथे आम्हाला उत्तम मशिनरी वापरता आली. फॅकल्टीज उत्कृष्ट आहेत. सहभागींची संख्या मर्यादित असल्यामुळे हे सेशन अतिशय 'इंटरॲक्टिव्ह' ठरले.

**श्री. हृषीकेश भानुशाली (जनरल मॅनेजर, थ्री-पॉइंट्स मेडिकल सिस्टीम)** आम्ही रिचर्ड-वुल्फचे चॅनेल पार्टनर आहोत आणि येथे इक्विपमेंट्सची व्यवस्था पाहण्यासाठी आलो आहोत. येथील 'कॅम्पस' अतिशय भव्य, विस्तीर्ण आहे. ऑपरेशन थिएटर्स सुसज्ज आहेत. येथे उत्तम आणि भरोशाची 'बॅक-अप करंट'ची व्यवस्था आहे जी काही वेळा मुंबईतही काही ठिकाणी पाहायला मिळत नाही. येथे ग्रामीण भागात अशी 'स्टेट ऑफ दी आर्ट' टेक्नॉलॉजी पाहायला मिळणे हे कल्पनेपलीकडील आहे! हे आता मी माझ्या डोळ्यांनी पाहिलंय म्हणून! नाहीतर मी विश्वास ठेवला नसता! हा सर्व सेट-अप तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट आहे. ऑपरेशन थिएटरमधील स्टाफ उत्तमरीत्या प्रशिक्षित आहे, ते सगळे सहकार्य करणारे आणि तुमचे म्हणणे ऐकून घेणारे आहेत! येथील 'निर्जंतुकीकरणा'चे काम अत्यंत काळजीपूर्वक केले जाते. येथील 'स्क्रब-रूम' सुद्धा खूप मोठी आहे, खरं तर येथे सगळेच भव्य आहे! येथील सर्व कॅम्पस, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स वगैरे सगळे मी पाहिले आहे.

वर्कशॉप अगदी सुरळीतपणे पार पडले. खरेतर हे पहिलेच वर्कशॉप, पण कॅम्पसमध्ये सगळेच उपलब्ध असल्यामुळे आमची पळापळ झाली नाही. अनेक ठिकाणी साध्या केबल अगर ॲडॉप्टरसाठी केवढी धावाधाव करावी लागत! पण येथे आम्हाला हॉस्पिटलचे 'आय.टी.' डिपार्टमेंट आणि स्टोअर्स डिपार्टमेंट्स यांची उत्तम मदत मिळाली.

**श्री. मार्कस शार्फेन (मॅनेजिंग डिरेक्टर, 'रिचर्ड वुल्फ, इंडिया')–**

मी जर्मनीतून आलो आहे. गेली सात वर्षे मी भारतात आहे. परंतु असे हॉस्पिटल मी अन्यत्र कोठे पाहिलेले नाही. हॉस्पिटलची भव्यता, स्वच्छता, पायाभूत सुखसोयी आणि महत्त्वाचे म्हणजे येथील आतिथ्यभावना अतिशय प्रशंसनीय आहे. उत्कृष्ट वर्कशॉपसाठी येथे उत्कृष्ट चौकट तयारच आहे. अनेक दृष्टीने हे वर्कशॉप एकमेवाद्वितीय आहे. उच्च तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे ते उच्च दर्जाचे झाले आहे. युरॉलॉजीच्या सर्व प्रकारांसाठी येथे आम्ही सिम्युलेटर्स आणलेले आहेत. अतिशय कार्यक्षम असे जर्मन वैद्यकीय पथक येथे काम करीत आहे. या कार्यशाळेला माझ्या शुभेच्छा!

या पहिल्या आंतरराष्ट्रीय युरॉलॉजी वर्कशॉपनंतर आता डेरवण हॉस्पिटलमधील सर्वांना वेध लागले आहेत ते पुढील वर्कशॉपचे!

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



*रिर्चड्स वुल्फ, इंडियाच्या कर्मचाऱ्यांसमवेत डॉ. नेताजी पाटील*




*हायक बेकर यांचे स्वागत*




*ख्रिस्टिन हुबेर्टुस यांचे स्वागत*



*मार्कस शार्फेन यांचे स्वागत*



*प्रदुषण विरहित वाहनातून फेरफटका*